## स्पे.दि.मु. ६८/२०१२ मधील निशाणी क्र. १९५ वरील आदेश
## (दिनांक १७/०६/२०१९)

१. वादीने अर्ज वादपत्रातील मसुद्यामध्ये सुधारणा करण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केलेला आहे.

२. वादीचा अर्ज पुढीलप्रमाणे ;

प्रस्तुतचा दावा दाखल झाल्यानंतर एक वर्षाने दावा मिळकतीचे वायव्य कोप–यामध्ये सुरेश बाळकृष्ण सुतार याने १००८ चौ.फूट क्षेत्राचे बांधकाम केलेले आहे. त्यामध्ये वीज व पाणीजोड घेतलेला आहे. वादीने त्याच्याकडे चौकशी केली असता प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांनी त्यास घर बांधण्यास मान्यता दिली आहे. त्यांचे मान्यतेनेच अनाधिकृतपणे त्याने घुसखोरी केलेली आहे. सदरील अतिक्रमणाबाबत प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांनी आत्तापर्यंत कोणतेही कथन केलेले नाही. तसेच जेव्हा जेव्हा वादीने ही बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणुन देणेचा प्रयत्न केला तेव्हा तेव्हा प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांनी त्याबाबत खुलासा केलेला आहे. सबब, सुरेश बाळकृष्ण सुतार यास प्रस्तुत कामी पक्षकार करण्यात यावे. तो या दाव्याच्या कामी आवश्यक पक्षकार आहे. सबब, वादपत्राच्या मजकुरामध्ये परिच्छेद क्रमांक ९.६७ असा नमुद करण्यात यावा तसेच वादपत्राच्या परिच्छेद क्रमांक १०, १२ व ३ मध्ये नियोजीत दुरुस्ती करण्यास परवानगी असावी.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र. ७ व ८ यांनी निशाणी १९८ प्रमाणे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शवला आहे. त्यानी सदरील सुरेश सुतार यास त्यांच्या मान्यतेने बांधकाम केल्याचे अमान्य केले आहे. तसेच वादीने वादपत्रामध्ये सुधारणा करणेचा प्रस्तुतचा अर्ज एवढ्या उशीरा का दाखल केला याबाबतचा खुलासा केलेला नाही. सदरील विषय हा वादी व सुरेश बाळकृष्ण सुतार यांच्या दरम्यानचा असुन या दाव्यातील विषयासंबंधीत नाही. सबब, अर्ज अमान्य करण्याची विनंती केली.

४. प्रतिवादी क्र. ५ व ६ यांनी निशाणी २०३ कडे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जास विरोध केलेला आहे. त्यांनी त्यांच्या अर्जामध्ये सदरील घटना २०१३ मधील असल्याचे वादी कथन करत आहे मात्र दुरुस्ती २०१९ मध्ये मागीतलेली आहे यावरुन वादी सतर्क नाही हे स्पष्ट होते. वादीचे वर्तन पहाता त्याने प्रस्तुतचा अर्ज दाव्याची चौकशी प्रलंबीत ठेवण्याच्या हेतुने दाखल केलेला आहे असे स्पष्ट होते. तसेच त्याने त्याच्या म्हणण्यामध्ये स्पष्ट केले आहे की, सदरील अतिक्रमणाशी प्रतिवादी क्र. ७ व ८ यांचा संबंध नाही. तसेच सुरेश बाळकृष्ण सुतार याच्या मदतीने वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. सबब, अर्ज अमान्य करण्याची विनंती केली.

५. अर्ज व म्हणणे पाहीले. उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

६. या अर्जाच्या निर्णयासाठी माझ्यापुढे उपस्थितीत झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष पुढीलप्रमाणे;

| **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|
| १. वादपत्रातील नियोजीत सुधारणा या वादाच्या अंतीम निर्णयासाठी जरुरीची आहे काय ? | .. नाही. |
| २. आदेश काय ? | .. अर्ज अमान्य. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ बाबत** :

७. वादीतर्फे युक्तीवाद करताना वादीच्या सन्मानीय वकिलानी असा युक्तीवाद केला की, वादीने प्रस्तुतचा दावा हक्कज्ञापनासाठी, निरंतरच्या मनाईसाठी व वैकल्पीकरित्या कब्जासाठी दाखल केलेला आहे. सुरेश बाळकृष्ण सुतार याने दावा मिळकतीच्या वायव्य कोप–यामध्ये चार ते पाच वर्षापासुन घुसखोरी करुन घराचे बांधकाम केले आहे व तो तेथे राहात आहे. त्यामुळे दावा वादपत्राच्या निकालानंतर हुकुमनाम्याची अंमलबजावणी करण्यासाठी तो पक्षकार असणे जरुरीचे आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज दाव्यामध्ये सुधारणा करणेसाठी दाखल करणे वादीस भाग पडलेले आहे.

८. प्रतिवादी तर्फे वकिलानी असा युक्तीवाद केला की, वादी जाणीवपुर्वक या प्रकरणाची संपरीक्षा प्रलंबीत ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे. नियोजीत सुधारणा वादपत्राच्या अंतीम न्यायनिर्णयासाठी जरुरीची नाही. सबब, अर्ज अमान्य करण्याची विनंती केली.

९. अभिलेखावरील दस्तऐवज पाहीले. वादीने प्रस्तुतचे वादपत्र सन २०१२ मध्ये हक्कज्ञापनासाठी व निरंतरच्या मनाईसाठी दाखल केलेले आहे व त्यामध्ये वादीने वैकल्पीकरित्या दावा मिळकतीच्या कब्जाची मागणी केली. प्रतिवादीने वादींकडुन त्यांची फसवणुक करुन दावा मिळकतीचे खरेदीपत्र ता. ०५/०९/२०१८ रोजी करुन घेतलेले आहे. ते मुलतः बेकायदेशीर असल्याने रद्दबातल आहे असे ठरवुन मिळणेसाठी वादपत्र दाखल केलेले आहे. तसेच त्यामध्ये प्रतिवादीने दावा मिळकतीमधील वादीच्या कब्जास हरकत अडथळा करु नये व त्रयस्थ इसमाचे हक्क निर्माण करु नयेत अशी निरंतरची मनाई मागीतलेली आहे.

१०. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीने दाखल केलेला तुर्तातुर्त मनाईचा अर्ज अमान्य झाला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये निशाणी १५७ कडे २१ ऑगस्ट २०१४ रोजी मुद्दे काढण्यात आले. त्यानंतर प्रतिदावा दाखल करण्यात आला. दिनांक १३/१२/२०१८ रोजी जादा मुद्दे काढलेले आहेत.

११. प्रस्तुतचे प्रकरण हे ७ वर्षापेक्षा अधिक जुने आहे. दिनांक १३/१२/२०१८ रोजी त्या प्रकरणात अतिरिक्त मुद्दे काढल्यानंतर वादीने निशाणी १८७ कडे प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांनी दावा मिळकतीवरती कर्ज काढले आहे का ? व त्याबाबत त्रयस्थ व्यक्तीचे काही हक्क निर्माण केले आहेत का ? याबाबत माहीती मागवण्यासाठी तसेच मुळ खरेदीपत्राचा दस्त दाखल करण्यासाठी अर्ज दाखल केला होता. त्यानुसार १६/०१/२०१९ रोजी आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादींनी ते दस्तऐवज दाखल केले. प्रतिवादी क्र. ५ व ६ यांनी त्याबाबतची पुर्तता केल्यानंतर ता. ११/०३/२०१९ रोजी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला.

१२. प्रस्तुत प्रकरणामधील वादी हे व्यवसायाने वकील आहेत. त्यांना कायद्याचे ज्ञान आहे. प्रस्तुतचा दावा ता. ३१/०३/२०१२ रोजी दाखल करण्यात आला. त्यानंतर साधारणपणे १ वर्षामध्ये सुरेश बाळकृष्ण सुतार याने दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन बांधकाम केलेले आहे असे वादीचे म्हणणे आहे. त्याबाबतचे ज्ञान वादीस केव्हा झाले हे अर्जामध्ये नमुद केलेले नाही. सदरील कथीत अतिक्रमण झालेचे वादीस माहीती होते. असे असतानाही वादीने तातडीने वादपत्रात सुधारणा का केली नाही याचा खुलासा वादीने केलेला आहे. या प्रकरणात वादीकडुन दिवाणी प्रक्रिया संहितेतील नमुद असलेल्या तरतुदीनुसार विविध अर्ज दाखल केलेले आहेत. प्रस्तुत प्रकरण

चौकशीस लागेपर्यंत वादीतर्फे या प्रकरणामध्ये वादपत्रात दुरुस्तीची मागणी केलेली नाही. मात्र प्रस्तुतचे वादपत्र चौकशीसाठी नेमण्यात आल्यानंतर वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. एवढ्या विलंबाने का दाखल केला याबाबत खुलासा केलेला नाही. वादपत्रामध्ये सुधारणा करण्याचा अर्ज शक्यतो मंजुर करावेत असे आधारतत्व प्रचलित आहे. वादपत्राची संपरीक्षा सुरु झालेनंतर मात्र सदरील आधारतत्व लागु असणार नाही. प्रस्तुत प्रकरणात संपरीक्षा सुरु झालेली नाही ही वस्तुस्थिती आहे.

१३. प्रस्तुत प्रकरणातील वादपत्र व वादी प्रतिवादी यांच्यामधील वादविषय पहाता वादीने ता. ०५/०९/२०१८ रोजी प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांच्या नांवे करुन दिलेले खरेदीपत्राची वैधता हा या दाव्याचा विषय आहे. वादीचा वादपत्रात सुधारणा करणेचा अर्ज पहाता त्यामध्ये सुरेश बाळकृष्ण सुतार याने दावा मिळकतीतील काही भागात प्रतिवादींच्या मान्यतेने घुसखोरी केलेली आहे व अतिक्रमण केलेले आहे असे वादीचे कथन आहे. एखाद्या व्यक्तीने मिळकतीमध्ये अतिक्रमण केले असेल तर तो या दाव्याचा विषय होणार नाही. त्यामुळे घुसखोराची प्रकरणातील उपस्थीती ही खरेदीपत्र वैधतेसाठी उपयुक्त व जरुरीची नाही. तसेच सुरेश सुतार याचे विरुद्ध वादास कारण हे त्याने अतिक्रमण केले त्या दिवशीचे होणार आहे.

१४. वादीने दावा दाखल केल्यानंतर व कथीत अतिक्रमण झाल्यानंतर ६ वर्षानी नियोजीत सुधारणा मागीतलेली आहे. विलंबाचे कारण अर्जात नमुद नाही. प्रकरण अतिशय जुने आहे. ते तातडीने निकाली करणे जरुरीचे आहे. अशा स्वरुपाचे अर्ज केवळ प्रकरणाची संपरिक्षा सुरु झाली नाही म्हणुन मंजुर केल्यास दावा आणखी काही वर्षे प्रलंबीत राहणार आहे. सदरचा अर्ज अमान्य केल्यास दाव्यावर कोणताही परिणाम होणार नाही. दावा मिळकतीमध्ये घुसखोरी करणे व खरेदीपत्राची वैधता हे दोन वेगवेगळे विषय आहेत. सबब, प्रस्तुतची नियोजीत सुधारणा ही वादपत्रातील वादाच्या हुकुमनाम्यासाठी जरुरीची नाही सबब मुद्दा क्र. १ बाबत माझा अभिप्राय नकारार्थी आहे.

**मुद्दा क्र. २ बाबत** :

१५. मुद्दा क्र. १ बाबत माझा अभिप्राय नकारार्थी आलेला आहे त्यामुळे वादीचा प्रस्तुतचा अर्ज अमान्य होण्यास पात्र आहे. वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन दाव्याची संपरीक्षा प्रलंबीत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. अशा परिस्थितीत या अर्जाचा खर्च वादीने प्रतिवादीस देणे संयुक्तीक होणार आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

# आदेश

१. अर्ज अमान्य करण्यात येत आहे.

२. दावा वादपत्राचा निर्णय काहीही झाला तरी या अर्जाचा खर्च वादीने प्रतिवादीस देणेचा आहे.

सही/-

(विनोद आर. पाटील)

दि. १७/०६/२०१९ ३रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, सांगली.